IMPACT FACTOR 5.473 (SJIF)
UPA NATIONAL E-JOURNAL
Interdisciplinary Peer-Reviewed Indexed E-Journal
ISSN 2455-4375

# आंबेडकरवादी कवयित्रीच्या कवितांमधील प्रतिमासृष्टी

**डॉ. अंजली पांडे**
बॅरि. शेषराव वानखेडे महाविद्यालय, खापरखेडा
९८२२३६७२४२
anjalimpande@gmail.com

साहित्य एक गतिशील, लवचिक आधि सृजनात्मक निर्मिती असून ते समाजाच्या हितसंबंधांशी संबद्ध असते. समाजातील बदलांचा वेध साहित्यातून घेतला जातो. नव्या वाटा, नवी वळणे साहित्यातून प्रकर्षाने नोंद घेतली जाते. नवता आणि गतिशीलता हा साहित्याचा स्थायीभाव आहे. दलित साहित्य हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारप्रणालीवर आधारित आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे दलित साहित्याचे उद्गाते आणि प्रेरणास्थान आहे. दलित साहित्य माणूस आणि मानवतेला केंद्रस्थानी मानते. दलित साहित्य हे प्रामुख्याने दलितांच्या लढयातून निर्माण झाले. या लढयाचे प्रभावी साधन म्हणून याचा निर्देश करता येईल. दलितांचे उत्थान आणि मानवतेचा जयघोष हेच या वाङ्मयाचे श्रेय आणि प्रेय आहे. म्हणूनच या साहित्याला आंबेडकरवादी साहित्य म्हटले जाते. बुद्धिवाद, मानवतावाद आणि विज्ञाननिष्ठा ही आंबेडकरवादी साहित्याची वैशिष्टये होत. एकोणीशे साठच्या दशकात उदयास आलेल्याया या साहित्याने सर्व सामाजिक , सांस्कृतिक, राजकीय स्थित्यंतराची नोंद प्रकर्षाने घेतल्याचे दिसते. 'वाङ्मयाचे स्वरूप सिद्ध करणारी तत्वे जशी आशयात असतात, तशीच वाङ्मयनिर्मात्याच्या निर्मिती सामर्थ्यात असतात. म्हणूनच एकाच काळात, एकाच सामाजिक, धार्मिक, राजकीय विचारांच्या पर्यावरणात राहून किंवा एकाच समाजात राहून निरनिराळे कलावंत निरनिराळी वाङ्मयनिर्मिती करतात. वाङ्मयकलेच्या स्वरूपात त्यात प्रकट झालेल्या समाजजीवनाचे आकलन आपण जोपर्यंत करणार नाही तोपर्यंत समाजजीवनाचा आणि वाङ्मयाचा संबंध स्पष्ट होणार नाही'[१] अर्थात साहित्य हे सामाजाभिमुख असावे असे डॉ. प्रभाकर मांडे म्हणतात. आंबेडकरवादी साहित्य हे समाजबांधिलकी जपणारे आणि समाजाभिमुखच आहे. शोषीत आणि पीडितांच्या वेदनेला त्यांनी आपल्या लेखणीच्या माध्यमातून शब्दरूप दिले यासाठी त्यांनी साहित्याच्या सर्व प्रकारांचा समर्थपणे अंगीकार केला. बहुतांश दलित साहित्यिकांनी आपल्या भावनांच्या व जाणिवांच्या अभिव्यक्तीसाठी काव्याचेच माध्यम स्वीकारले. दलित साहित्याची प्रेरणा, त्याचे तात्विक अधिष्ठान, दलितांच्या जगण्याचे संदर्भ या साऱ्यांचा सर्वंकष परामर्श आंबेडकरवादी कवितेने घेतल्याचे दिसते. यासाठी या कवींनी मुक्तछंदाचा प्राचुर्याने वापर केलेला दिसतो. ही कविता दलित कवींच्या जीवनानुभवातून निर्माण झाली आहे. ज्या परंपरेने असे अगतिक आणि अपमानास्पद जिणे लादले त्या परंपरेचा आणि त्या भूतकाळाचा तिरस्कार या कवितेतून तीव्रतेने नोंदविल्या गेला आहे. समाज मनाला हादरे देणाऱ्या आणि समाजभानाला जपणाऱ्या अशा या कवितेने परंपरागत व रूढ संकेत नाकारून मराठी साहित्यात आपले वेगळे अढळ स्थान निर्माण केले आहे. 'भूतकाळ आणि वर्तमानकाळ यातील दु:ख व वेदना यांचा अविष्कार करणाऱ्या दलित कवितेला निराशेचा स्पर्शही झाला नसून भविष्यकाळाची अत्यंत उर्जस्वल अशी स्वप्ने तिने रंगवलेली आहेत. सामाजिक समतेची, मानवमुक्तीची, विश्वबंधुत्वाची गाणी तिने उत्साहाने गायिलेली आहेत. दु:ख, वेदना, विद्रोह, नकार यांच्याबरोबरच कृतज्ञता, आदर, आशावाद आणि उत्साह ही एकूणच दलित कवितेच्या आशयविश्वाची

वैशिष्टये आहेत'[२] ही वैशिष्टये आंबेडकरवादी कवींप्रमाणेच आंबेडकरवादी कवयित्रींच्या काव्यातही आढळून येतात. आंबेडकरवादी कवींप्रमाणेच आंबेडकरवादी कवयित्रींचेही साहित्यात अमूल्य योगदान आहे. त्यांच्या काव्यात अस्वस्थ, वेदनामयी आणि अशांत जीवनाचा जसा रक्तबंबाळ उद्‌गार आहे तसाच स्त्री म्हणून भोगाव्या लागत असलेल्या यातनांचा आक्रांशपूर्ण हुंकारही आहे. कवयित्रींच्या कवितेत एकतर दलित म्हणून आणि दुसरे स्त्री म्हणून असे भोगाव्या लागणाऱ्या यातनांचे दुहेरी स्वरूप दिसून येते. वर्णव्यवस्थेने आणि पुरूषप्रधान व्यवस्थेने लादलेल्या चौकटीत बंदिस्त होऊन नानाविध वेदनेच्या कळा मूकपणाने सहन करणाऱ्या या स्त्रियांना डॉ. बाबासाहेबांनी मुक्तीचा मार्ग दाखविला. त्यांच्या इंच्छा आकांक्षांरूपी पक्षांना आकाशात उंच भरारी घेता यावी म्हणून शब्दरूपी पंख दिले. त्यांच्या संवेदनांच्या अभिव्यक्तीसाठी लेखणीचे सशक्त आणि समर्थ साधन दिले. हे शब्दपाखरू डॉ बाबासाहेबांच्या प्रेरणेने समाजरूपी आकाशात निर्भयपणे आणि आत्मविश्वासाने मुक्त संचार करू लागले, व्यक्त होऊ लागले. ही कविता व्यष्टीबरोबरच समष्टीमनाशी एकरूप होणारी आहे. ही कविता म्हणजे कवयित्रीच्या वास्तव अनुभवाचे वाङ्मयीन रूप होय. अनुभवाच्या समृद्धीतूनच प्रतिभेचा विलास शक्य होतो. काव्यसृष्टी कवीच्या अनुभवसृष्टीतून निर्माण होते. जसा अनुभव तशी काव्यसृष्टी! आंबेडकरवादी कवयित्रींचा अनुभव धगधगता, दाहक आणि हृदयद्रावक आहे म्हणून त्यासाठी येणाऱ्या प्रतिमा त्या आशयाला पेलणाऱ्या अवतरल्या आहेत. 'कविता ही शब्दमाध्यमातून प्रकट होत असली तरी कवीच्या प्रतिभासामर्थ्याने नवनवीन प्रतिमासृष्टी तीत निर्माण होते. शब्दांना अर्थगर्भता प्राप्त होते ती प्रतिभेमुळेच. म्हणूनच कवितेला अनेकार्थाक्षम भाषारूपही म्हटले आहे. कविता प्रतिमांचे सेंद्रीस सुसंघटन असते. साहित्य—काव्यात प्रतिमांना अनन्यसाधारण महत्व असते'[३] आधुनिक काव्याप्रमाणेच आंबेडकरवादी साहित्यातही प्राच्युर्याने प्रतिमा आढळतात. या काव्यात प्रतिमांची वैविध्यता आणि विपुलता असल्याचे दिसते. मात्र आंबेडकरवादी कवींनी वापरलेल्या प्रतिमा काहीशा अपरिचित काहीशा अगम्य, पारंपारिक संकेतांपेक्षा वेगळया आणि पारंपरिक संकेतांना झुगारणाऱ्या आहेत.म्हणून कधी कधी त्या दुर्बोध वाटतात. आंबेडकरवादी कवयित्रींच्या काव्यातही अशा प्रतिमा बाहुल्याने आढळतात.

आंबेडकरवादी कवींप्रमाणेच आंबेडकरवादी कवयित्रींच्या शब्दाला धार आहे. त्यात तप्त ज्वालांचा अंगार आहे. या कवयित्रींची जगाकडे पहाण्याची वृत्ती अधिक प्रखर आहे. स्त्रियांची भाषा, प्रतिमासृष्टी, रचनाविष्कार, आणि त्यांची अनुभवाकडे बघण्याची पद्धतीही वेगळी आहे. ही कविता अधिक गहरी आणि सखोल आहे .दलित कवियत्रींच्या काव्यात परिघाबाहेरचे जग मोठया प्रमाणात अधोरेखित झाले आहे. सुगंधा शेंडे, आशा थोरात, हिरा बनसोडे, ज्योती लांजेवार, सुरेखा भगत, संध्या रंगारी, धम्मज्योती शेगाकार कांबळे, मीना गजभिये अशा अनेक कवयित्रींच्या काव्यविश्वात स्त्री विषयक आत्मभानाचे नवे संदर्भ दिसून येतात.

' माणसं घडविण्याची प्रयोगशाळाच जणू............
घडली जात आहेत मनं
कुठल्या मुशीतून?
ओठात हसू, पोटात विष
उक्ती आणि कृती ह्यांचा कसा नाही ठेवायचा मेळ ............
तीच सुरू आहे आहे पद्धतशीर कवायत. (मीना गजभिये — पिंपळवृक्ष )

माणसांच मन आणि हसऱ्या चेहऱ्यामागील विखारी भावना, उक्ती कृतीतील विरोधाभास स्त्रीमनाची परवड आणि जगण्यासाठी करावी लागणारी कवायत या साऱ्यातून माणसाची होणारी कुचंबणा असे माणसाच्या वागण्याचे सारे संदर्भ मीना गजभिये आपल्या ‘ पिंपळवृक्ष ’ या कवितेत नोंदवतात. आखीव रस्ते, कवच बदलणे अशा प्रतिमा योजून कवयित्रीने माणूस परिस्थितीनुसार कसा बदलतो हे प्रकर्षाने मांडले आहे.

‘ सजवलेल्या बिजवर शब्दांनी
त्यांनी माझं स्वागत केलं
जुन्याच मळक्या प्रकाशाची पाऊलवाट
त्यांनीच दाखवली ’ (मल्लिका अमरशेख – सजवलेल्या बिजवर शब्दांनी)

स्वत:चे अस्तित्व जपण्याची असोशी मल्लिका अमरशेख यांच्या ‘ सजवलेल्या बिजवर शब्दांनी’ या कवितेतून ठसठशीतपणे अभिव्यक्त झाली आहे. स्त्रीत्वाचे भान आणि स्त्रीत्वाचा शोध हा त्यांच्या कवितेचा केंद्रबिंदू आहे. हा शोध घेत असतांना ‘कुजणाऱ्या गटारात आयुष्य शोधलं नव....’ असे त्या आपले निरीक्षण नोंदवितात. यासाठी त्यांनी वापरलेल्या प्रतिमाही पारंपरिक संकेतांना छेद देणाऱ्या आहेत. प्रखर सामाजिक जाणिवेचया कविताही मल्लिका अमरशेख यांनी लिहिलेल्या दिसतात. सजवलेले बिजवर शब्द, मळक्या प्रकाशाची पाऊलवाट, जुनं कुंपण, शिळे काटे, थुंकणाऱ्या नजरा, नवीन जंतू अशा नव्या प्रतिमा वापरून चाकोरीबाहेरील संकेतांचा धांडोळा त्यांनी घेतला आहे..

‘ हे तळहातांनो!
तुम्ही समर्थ असा,
तुम्ही म्हणजे रेषा नव्हे,
रेषा तुमचा चेहरा नव्हे
बाह्यांग म्हणजे अंतरंग नव्हे
तुमच्यात उमेद आहे, शक्ती आहे,
तुम्ही.....लढा, तुम्ही लढा–
समानतेसाठी इज्जतीसाठी, संघर्षासाठी,
सार्थकी लागणा–या बलिदानासाठी, ( सुरेखा भगत – तळहाताच्या रेषांनो )

आंबेडकरवादी कवयित्रींनी आत्मभानाच्या अभिव्यक्तीबरोबरच समाजभानही जपले आहे. सुरेखा भगत यांनी नशिबावर विसंबून न राहता आपल्या कर्तृत्वावर विश्वास ठेवावा असे सांगितले आहे. बाह्यांगाचा विचार न करता अंतरंगातील उर्जेचा वापर संघटित होण्यासाठी आणि स्वाभिमानाने जगण्यासाठी करावा. कोणत्याही प्रकारच्या परिणामांची तमा न बाळगता लढा द्यावा असं कवयित्री म्हणतात. त्यांच्या या कवितेतून विद्रोहाचे दर्शन घडते. यासाठी कवयित्रीने वापरलेल्या प्रतिमांमधून विद्रोहाचा स्वर अधिकच तीव्र व दाहक झालेला दिसतो. विजांची शस्त्रें, भ्रष्ट देहाच्या चिता, पेटलेले अंगार, जुलुमांचे प्रदेश, अभागी तळहात अशा या प्रतिमांमधून कवयित्रीने गायिलेले विद्रोहाचे गीत अधिकच उर्जस्वी झाले आहे.

दलित स्त्रियांच्या व्यथेचा शोकात्म पट जगासमोर मांडणे हा दलित कवयित्रींच्या कवितेचा स्थायीभाव आहे.स्त्री जीवनाचे अनेक पदर या कवितेने उलगडून दाखविले. स्त्रियांचे शोषण, तिच्या स्त्रीत्वाच्या मर्यादा, पुरूषांची वासनांधता, पुंरूषांचा स्त्रियांकडे बघण्याचा दृष्टिकोण, अशा अनेकविध पातळयांवर होणारी तिची पिळवणूक या साऱ्यांचे दर्शन आंबेडकरवादी कवयित्रींच्या कवितेतून ठळकपणे अधोरेखित झाले आहे. विद्रोह, विषमतेबरोबरच स्त्रीच्या आत्मसम्मानाचे भान व्यक्त करण्यारी युगजाणीव

आंबेडकरवादी कवयित्रींच्या कवितेतून अधोरेखित झालेली दिसते. स्त्री म्हणून जगण्याचे अर्थ, तिच्या अस्त्विाचा प्रत्यय, तिच्या जाणिवांचे अस्वस्थ करणारे समस्त संदर्भांचे एक एक पदर या कवितेतून उलगडत जातात. या जीवनातील भीषणता व्यक्त करण्यासाठी या कवयित्रींनी योजलेल्या प्रतिमासृष्टीची समृद्धता आंबेडकरवादी कवयित्रींच्या काव्यात दिसून येते.

**संदर्भ ग्रंथ सूची :—**

१. दलित साहित्याचे निराळेपण — डॉ.प्रभाकर मांडे — गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद — पृ ४६
२. दलित साहित्य एक आकलन — ले. बाळकृष्ण कवठेकर — विजय प्रकाशन, नागपूर — पृ. १९
३. दलित साहित्य चर्चा — डॉ. सुनील रामटेके — आकांक्षा प्रकाशन, नागपूर— पृ ६५
४. विद्रोही कविता — संपा. केशव मेश्राम — कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे